क्र./कक्ष-१२/एमयुएन-१/कावि-५४१/२०१९
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचे
कार्यालय, नागपूर. दिनांक३०/१०/२०१९.

# <u>जाहीर सूचना</u>

## नगरपरिषद कन्हान पिपरी सार्वत्रिक निवडणूक - २०१९-२०

नगरपरिषद कन्हान पिपरी - २०१९-२० मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागातील जागांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन सामान्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१९** रोजी १२.०० वाजतापासून नगरपरिषद कार्यालय, कन्हान पिपरी येथील **बचत भवन** येथे आरक्षण सोडत काढण्यात येईल. या सभेमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी तसेच अनसुचित जातीच्या महिला, नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिला व सर्व साधारण महिला यासाठी आरक्षण सोडत काढून जागा निश्चित करण्यात येतील. तरी इच्छुक नागरिकांनी आरक्षण निश्चितीच्या सोडतीच्या कार्यक्रमास कृपया उपस्थित राहावे.

दिनांक: ०१/११/२०१९

Thakare
जिल्हाधिकारी, नागपूर

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट -१

**माहे फेब्रुवारी-२०२० मध्ये मुदती संपणाऱ्या कन्हान-पिपरी व गडचांदूर या २ नगरपरिषदा व लांजा नगरपंचायतीसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम -२०१९-२०.**

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.७/का-०६, दि.२५/०९/२०१९ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषदा/नगर पंचायतीच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | १५/१०/२०१९ (मंगळवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | ३१/१०/२०१९ (गुरुवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे (जिल्हाधिकारी व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटसह) | जिल्हाधिकारी | ०१/११/२०१९ (शुक्रवार) |
| ४. | नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | ०५/११/२०१९ (मंगळवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०७/११/२०१९ (गुरुवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | ०७/११/२०१९ (गुरुवार) ते १६/११/२०१९ (शनिवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | **२०/११/२०१९ (बुधवार) पर्यंत** |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांचेकडे अहवाल पाठविणे** | जिल्हाधिकारी | २२/११/२०१९ (शुक्रवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | **२७/११/२०१९ (बुधवार) पर्यंत** |
| | क) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह) | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषद/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ३०/११/२०१९ (शनिवार) पर्यंत |

टीपः- प्रत्येक नगर परिषद/नगर पंचायतीची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

D:\HENDARE - २०१७\Arm N.P - Copy.doc